म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ११९०

# थूः त्यांच्या जीनगानिवर !

कवि सूर्यनारायण पुणें

REFBK-0019527
REFBK-0019527

... र. उपासक, ३१ शनिवार पुणें.

... शी, चित्रशाळा प्रेस, पुणेंशहर.

# इतस्ततः

शहाणपणाचे शब्द सांगण्याची, शब्दाचें शहाणपण शिकविण्याची किंवा शाब्दिक सारीपटाची संघटना करण्याइतकी माझ्यांत करामत नाहीं. दुर्दैव माझें ! त्याला कोण काय करणार ! आहे त्यांतच समाधान मानलें पाहिजे, नसतें एखाद्याच्या नशिबीं भाषापांडित्य, म्हणून काय उदास व्हावयाचें ?–थूः त्येच्या जीनगानिवर !

× × ×

" अर्रर्र, हो हो–घसरलेच सारे !–थूः त्येच्या जीनगानिवर "

" अबे ए बेवकूब, गाली किसिकुं देता है ? "

" अरे, तुलारे गाली कोण देतो ? मी आपला शिवी देतों आहें. "

"हां,तो फिर कुच हरगिज नही. गालि देयंगा तो याद रख!"

ही परवांची गोष्ट. आठवली सहज–सांगितली. अहो, मनाला मोठा अचंबा वाटला कीं,-अशींच शहाणीं माणसें जगभर पसरलीं तर मग कसें ?-परंतु, आतां वृथा ही चिंता कशाला ? आमचें दयाळू सरकार आहेना आम्हांला शहाणें करावयाला-एक शतक-येथें येऊन बसलेलें ! मग काळजी ?–थूः त्येच्या जीनगानिवर.

आमच्या संरक्षणासाठीं आणि सौख्यासाठीं जळतें तेल डोळ्यांत घालून सरकार रात्रंदिवस तत्पर असतांना आपली ‘ पखाली तहान, बाजूस ठेवून महाराष्ट्र जर पंजाब–प्रकरणावरच जोर देऊन, मेलेले मुडदे उकरून-मेलेल्या माणसांचा जागता पहारा बसविणार असेल तर वरिष्ठ-सुज्ञांनीं आम्हांला शहाणें तरी केव्हां करावयाचें ? भारी गैदी आहो बुवा आम्ही महाराष्ट्रीय ! बा महाराष्ट्रा, तुझी झोंप, सुस्ती अद्याप पुरी होत नाहींना ?–काय ? कोण बोलत आहे ? “ धीरानें घ्या ! ” अजून आस्तेकदम ?–प्राणावर बेतली तरी ‘ धीर पाहिजे ? ’ हाय ! अशा वेळींहि आम्हांला धीरच धरावयाला पाहिजे असेल तर–तर–थूं, थूं, थूं: त्यांच्या जीनगानिवर ! ! !

## आतां तरी पुढें–

माझ्या आवडत्या आणि जिवलग दोस्तांनों, तुमचें हृद्गत फोडण्याची किंवहुना हलविण्याची माझी नियत नाहीं, हें मला कबूल केलेंच पाहिजे ! पण, तुम्ही आपणहोऊन जरासा विचार करा व–बस्स पूर्ण विचारच करा ! भगवान श्रीकृष्ण म्हणतात–

**“ नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायोह्यकर्मण: ॥ ”**

ॐ नमो लोकमान्याय

सर्वांचा सेवक

**सूर्यनारायण**

सं. काव्य
८८८.
काव्य
८८८
१९५२८

# थूः त्येच्या जीनगानेवर !

[ निकराच्या लढाईंत सेनेची शिस्त बिघडून कचित् युद्धशास्त्रहि ढळल्यावांचून राहणार नाहीं !-मग कर्तव्यप्रीतीच्या नादब्रह्मांत असतांना-शब्द-किंबहुना भाषाशास्त्राची हत्या घडल्यास-भक्तीच्या प्रेमलहरीला ओहोटी लागेल ही भीति यावेळीं कोण बाळगणार आहे ? दोषाचें जबाबदार कर्तव्य आहे. ]

चालः—एडका मदन०—

तुटे आधार । गेले टिळक जगता-पार ॥ धृ० ॥
कोसळला डोंगर दुःखाचा ।
केला ग्रास खलें बाळाचा ।
निर्दय, अधम, नीचतर साचा
रडेना फार ! थूः त्येच्या जीनगानिवर
मेला-गेला माझा बाळ ।
अपुल्या प्रेमाचें तें बाळ !
धरुनी घट्ट उरां झोंबाल ।
डरेंच भार ! थूः त्येचा जीनगानिवर ॥ २ ॥
माझे माझे म्हणुनी मेले ।
त्यांना कोण फिराविण्या गेले ।

REFBK-0019527
REFBK-0019527

गेले तर ते येतिल कां रे ?
शोकआधार । थूः तुमच्या जीनगानिवर ॥ ३ ॥
सोडा सोडा हो मोहाला ।
लागा राष्ट्राच्या कार्याला ।
ऐसे मुखडे मधु तुम्हांला !
लज्जित चार । थूः तुमच्या जीनगानिवर ॥ ४ ॥
नरकूल कसलें रे शोभवितां ।
नर्कीं कां न त्याहुनी पडतां ।
टिळकां कां रे वदाना आतां ।
जयजयकार ! थूः तुमच्या जीनगानिवर ॥ ५ ॥
पाहा पाहा उघड्या डोळीं ।
हातांत निजबंधुच्या झोळी !
घरदाराची जहालि होळी ।
मने निष्ठूर ! थूः त्यांच्या जीनगानिवर ॥ ६ ॥
आले आजवरी बहु चोर ।
चोरीला करिती धरा-भर ।
काळें केले किति उपकार ।
असले थोर ! थूः त्यांच्या जीनगानिवर ॥ ७ ॥
गेला महाराष्ट्रकोहिनुर ।
झालों निजदुःखांतचि चूर ।

कर्तव्याची पडली भूल ।
सोडिना दूर । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ८ ॥
सावध ! सावध नूतन व्हारं ।
उघडें पडलें रे घरदार ।
अगा ! शेजारि हो शिरजोर ।
उडवा शीर । भो महाराष्ट्राचे वीर ॥ ९ ॥
उठा उठा तर जागे व्हारं ।
लढतां लढतां मेले बा रं ।
त्यांचेचि तुम्हि वंशज सारं ।
छांत्रिं कां धूळ ! थूः तुमच्या जीनगानिवर ॥ १० ॥
शिवनेरिचा सिंह हरपला ।
शिरपेंचाचा तोरा हरला ।
कंबरेंतला कांटा सरला ।
रडें हो आलं ! थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ११ ॥
आले मागुनि-पुढें निघाले ।
अक्कल-नांवें खंदकवाले !
हिंदुस्थाना लुटण्या आले ।
कान पिळा तर ! थूः त्येच्या जीनगानिवर ॥ १२ ॥
दशा काय पाहा राष्ट्राची ।
आठवालि मनिं शांति कैंची ।

ढुंगणाच्या चोरि वस्त्राचि ।
झालि न कां रं । थूः तुमच्या जीनगानिवर ॥ १३ ॥
उदरीं माय वाहि नऊ मास ।
वाढिला लाविले दिसमास ।
आंगिचें तोडुनि दिधलें मांस ।
तुम्हां साठिंच । तरुण हो ! महाराष्ट्रचं ॥ १४ ॥
सजली उपकारबद्ध काया ।
ल्यालया लुगडीं माया, जाया ।
नेईल सोडुनि भाऊराया ।
अब्रूदार । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ १५ ॥
× + +
गांजिलें असुरांनि जगताला ।
न्हाउनि नेदी मा-भगिनीला ।
रडणें आलें हिंदधरेला ।
नाश न वारी । थूः त्येच्या जीनगानिवरि ॥ १६ ॥
सुख क्षिरसागरिं भोगित होता ।
भो भगवान् श्रीकृष्ण, अनाथा ।
धैर्य-निघाला देण्या-समता ।
फुटकें भाल । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ १७ ॥
पूर्विल शाहिर बोला ऐका ।

गौरी बोले " श्री हर ऐका ।
कां त्यजी दया कारुणीका ।
घ्या अवतार । तारा हो बालकें सारं " ॥ १८ ॥
तोंवि घेउनि उठला त्रिशूळ।
आला गड-कोंडाणीं त्रिपूर ।
जिजाई प्रसवालि निज गरोदर ।
तो अवतार । छत्रपती शिवसंभार ॥ १९ ॥
परी पावे लय तोही काळ ।
मातला चहूंकडे कळिकाळ ।
झालें हवालदिल दिलदार ।
नयनीं ये नीर । सर्वांच्या पात्रिं धरा-भर ॥ २० ॥
सन सतराशें एकसष्ट्र आलें ।
भाऊ, नाना रडले, लढले ।
शिलालेख पानपतीं वठले ।
दुर्दैवानें । बहु शिकास्ति दिधले ठाणें ॥ २१ ॥
नंतर झाले-आले नवल ।
पांडव पुनरपि जगीं अवतरलं ।
महादेव, गोपाळ, गोखलं ।
शास्त्रि, श्रीबाळ । बोला हो जयजयकार ॥ २२ ॥
होता आषाढ-पर्वाचि मास ।

मा.

वद्य तीथि सुंदर शष्टीस ।
होते श्वान चिकट हाडास—।
तें चघळीत । बैसले तसे सदोदीत ॥ २३ ॥
सोळाशें सत्ताविशिं शिवबा ।
त्यानंतर सामान्य बहु बा ।
गेले ते–तैसे होतिल बा ।
टीळकबाळ । हो नोकरशाहिसि काळ ॥ २४ ॥
धरिला, अडकविला 'जेलां' त ।
होता तो तेथूनी सांगत ।
' धरा धीर ' तरुण स्फूर्ति तेजांत ।
नाहींतर । थू त्येच्या जीनगानिवर ॥ २५ ॥
कां रे टिळक–वर्णनीं चुकतां ।
ऐका राष्ट्रकविच्या सु–मता ।
भावी पिढिचें विचार चित्ता ।
न शिवे कां रं । थूः तुमच्या जीनगानिवर ॥ २६ ॥
होते ' कवि कां न्हावी अजला ' ।
तों–जों टिळक–वर्णना टळला ।
राष्ट्राच्या झटतां उद्धारां ।
मोबलादरं । त्याची विस्मृति हा कां रं ॥ २७ ॥

\+ × +

येऊं द्या कृति स्फूर्तिला बहर ।

छातिचें तुटुनि जाऊं द्या पदर ।<br>
होइल धन्याचि हिंदिचें सदर ।<br>
ऐके ना तर । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ २८ ॥<br>
पाय गोमातेचें पूजितां ।<br>
वंद्याचि खरोखर ती जगतां ।<br>
जैशी पवित्र वसुधा माता ।<br>
कांपि चराचर । थू त्येच्या जीनगानिवर ॥ २९ ॥<br>
फंडा पैसा पैसा देतां ।<br>
आस्तेकदम कृति न कां करितां ।<br>
तरीच येईल यश कार्यरता ।<br>
द्याना नजर । थूः तुमच्या जीनगानिवर ॥ ३० ॥<br>
बैसला उरावरी कर्झन ।<br>
तैसा जनरल डायर दुर्जन ।<br>
-वायर, चेम्सफर्ड निर्मन ।<br>
दे न कैवार । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ३१ ॥<br>
लाइड जॉर्ज मुत्सद्दी मोठे ।<br>
म्यांटेग्यु छत्रीचें साटे ।<br>
सांगु या नामावलिला कोठें ।<br>
रडके भाल । त्यां कोण-काय करणार ॥ ३२ ॥<br>
खोडा, सोडा, मोडा अधिरा ।

कर्तव्याचा करिं घ्याचि सुरा।
स्वराज्यास्तव सांडा जिवरां।
भाऊराव। करूं चरणीं किती नव भाव ॥ ३३ ॥
कां हो तुम्हां करुणा ये ना।
फेडा मातृभूमिच्या ऋणा।
कुश जननीचि कां उजवाना।
पांडुरंग। पंढरीसि देऊं सुरंग ॥ ३४ ॥
कसल्या भेदाभेदा बघतां।
इराणिभट चारित बिस्किटा।
थोराचोरुनि मुत्रहि पीता।
लाज न कां रं। थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ३५ ॥
खाडिलकर, श्रीपाद, गडकरि।
देती बोधा नाट्यअधारी।
नका पिवुं भाऊ मद्य विषारि।
मानी न का रं। थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ३६ ॥
भोपटकर बंधुंचा 'भाला'।
परांजप्यांच्या मुकला 'काळा'।
मा-दीन! विक्रम चरणीं घाला।
गा बेकार। थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ३७ ॥

वाचा इंग्रजींत ' मराठा ' ।
' केसरी ' जातिवीर मराठा ।
खवळो सारॅ हिंदमराठा ।
दील धरणार । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ३८ ॥
जननी, भगिनी, प्राणसखीला ।
उघडे करितो एकच प्याला ।
दारुड्ष्काचा सुंदर भाला ।
घेति छातिवर । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ३९ ॥
आले लवाटे दाढिवाले ।
हात जोडुनी पुढें ठाकले ।
निषेध करुनि 'दारू' बोलले ।
सोडिन दारूं । थूः त्येच्या जीनगानिवरू ॥ ४० ॥
करिती ' जागरूक ' बोभाटा ।
मूर्खशिरोमणि ' विजयी मराठा ' ।
लेखणी न तरि हातिं खराटा ।
झाडि परदार । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ४१ ॥
दारूबाजा योग्यचि वदतो ।
' दीनमित्र ' अपणा म्हणवीतो ।
जणूं कोळूनि लज्जा पीतो ।
मराठाजार । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ४२ ॥

आसुडाचे त्याचे फटके ।
लोकीं ब्राह्मणावरी फेके ।
उडवा त्यांवरि उलटे फटके ।
पाठीवर । थू: त्येच्या जीनगानिवर ॥ ४३ ॥
गाली ब्रह्मकुलांसी द्याव्या ।
नेत्रिं येती रेषा हिरव्या ।
पर गोऱ्याच्या भुलतां काव्या ।
पाय शिरावर । थू: त्येच्या जीनगानिवर ॥ ४४ ॥

× × ×

एकोणिशें एकोणिस सालिं ।
काय नवलकथा जी वर्तला ।
पाहिजे अजला सकळा कळाले ।
ध्यानीं घ्यारे । नोकरशाहीचे साले ॥ ४५ ॥
नियतकालिक परवानगीला ।
केले तदा नम्र अर्जाला ।
आले पोलिसराज गृहाला ।
म्हणतो ' चाला । इनेस्पेक्टर-कचेरीला ' ॥ ४६ ॥
आला नशिबी पोलिसखाना ।
पोलिस घे तानावर ताना ।

तेवि दिसे मोंगलि बे-दाणा ।
खाना-फरस । ढासळुनि फोडा फरस ॥ ४७ ॥
कसले राष्ट्रकार्य रे करितो ।
घरांत विझलि चूल पेटवितो ।
कूलदिपक बाहेर म्हणवितो ।
शहाणा फार । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ४८ ॥
उत्कर्षाचा कपरा काढी ।
गोंजारीली क्षणभरि दाढी ।
त्यांचीच धरा गँदी शेंडो ।
हरामखोर । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ४९ ॥
गृहांत शिरले-बसले भेदे ।
प्रामाणिक मेले बा-ज्यादे ।
दारीं पाळत करिती सोदे ।
बिलंदर । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ५० ॥
आली शहाणी अनि बेझंट ।
जम्नादास धरी पथ झूट ।
फसविल असले ती भोळसट ।
खुळ्यांचं सारं । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ५१ ॥
सी. के. शिकवित राजकारणा ।
केवळ 'भट' म्हणुनि कां हाणा ?

असल्या न्याया द्या पदिं माना ।
कोल्हापूर । भरले अन्यायि सं-पूर ॥५२॥
जगाचे गुरु शंकराचार्य ।
करवीर धिःकारी सहकार्ये ।
झाले पतित तँ राजकार्य ।
कुटिल हा काळ । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ५३ ॥
छत्रपतीची वंद्यचि गादी ।
छत्रपति परि भलत्या नादी ।
देशदया देवा, दे बुद्धी ।
स्मारक स्थीर । छत्रपति गादी तार ॥ ५४ ॥
आतां पुरँ पुरँ व्यवहार ।
मोडा विश्वाचा संसार ।
घरदाराचा हो बाजार !
करा संव्हार । ब्रह्मांडाचा चिर-सार ॥ ५५ ॥
नाही ठावूक भाषाशास्त्र ।
शिकलो कर्मानँ जँ शास्त्र ।
गिरवित बैसलो मी निःशस्त्र ।
शब्दसंस्कार । जो घडला थोडाफार ॥ ५६ ॥
क्षमा कराहो मायबापसे ।
दीन तनय चरणा लागतसे ।

नच धिःकारा उण्याऽधिकसें ।
ओ श्रीधर ! तत्स्वरूप टिळक भजणार ॥५७॥
महात्मा गांधी दावित मार्ग ।
असहकारिता हा सन्मार्ग ।
सत्याग्रह हा स्वराज्यमार्ग ।
जें न धरणार । थूः त्येच्या जीनगानिवर ॥ ॐ ॥

# लो. टिळकांचा

## जयजयकार

जय जय जय बोला । श्रीबाळा
ओवाळुं आरती तुजला ॥ १ ॥
पंचारती हातीं । पाजळती
हृदयसंपुटीं भक्ति ॥ २ ॥
स्वराज्य व्रत धरिलें । मनि रुचलें
कंकण तें धैर्यबळें ॥ ३ ॥

आपण दाखविले । बिंबविले
निःस्वार्थपणा दिधले ॥ ४ ॥
आपुल्या करि झालें । दरवळलें
श्री कर्मयोगा केलें ॥ ५ ॥
चतुर्भुजा ऐशा । कृष्णेशा
कर जोडि परमेशा ॥ ६ ॥
घ्याहो अवतार । राष्ट्रवीर
सारखी वरती नजर ॥ ७ ॥
प्रसाद द्या बाळा । दीनाला
शेवटच्या आधारा ॥ ८ ॥
जय जय जयकार । टीळक बाळ
बोला बोला सकळ ॥ ९ ॥

---

मुद्रक—शंकर नरहर जोशी चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ पुणें सि प्रकाशक—दत्तोपंत उपासक ३१ शनिवार पेठ पुणें सि.



REFBK-0019527
REFBK-0019527
१९५२८.